follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २४४ * सातारा, मंगळवार दि.१४ मे २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/



## बिहारचे माजी उपमुख्यमंत्री सुशील कुमार मोदी यांचे निधन

**नवी दिल्ली :** बिहारचे माजी उपमुख्यमंत्री सुशील कुमार मोदी यांचे सोमवारी निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. सुशील मोदी हे बिहारमधील भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी एक होते.

बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी एक्सवर पोस्ट करून सुशील कुमार मोदी यांच्या निधनाची माहिती दिली आणि दु:खही व्यक्त केले. सम्राट चौधरी यांनी म्हटले की, बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि माजी राज्यसभा खासदार श्री सुशील कुमार मोदी यांना त्यांच्या निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली. बिहार भाजपाचे हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.

## घाटकोपरमध्ये होर्डिंग कोसळल्याची घटना

मुंबईतील वादळामुळे घाटकोपरच्या पूर्व द्रुगती मार्गावरील पेट्रोल पंपावर मोठं लोखंडी होर्डिंग कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला असून ५९ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच आतापर्यंत ६७ जणांना बाहेर काढण्यात यश आलं आहे. दरम्यान, या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी या घटनेची चौकशी करण्याचे निर्देश दिल्याचेही सांगितले.

# ...तर राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष फुटलेच नसते, अमित शाहांचा दावा

**राजदंड न्युज नेटवर्क :**

**धुळे :** राज्यात लोकसभेच्या चौथ्या टप्प्यासाठी आज मतदान पार पडले. आता पाचव्या टप्प्यामध्ये मुंबई, ठाण्यासह नाशिक, धुळ्यामध्ये मतदान होणार आहे. याच पार्श्वभूमीवर धुळ्यात आजभाजपाचेनेते आणि केंद्रीय मंत्रीअमित शाहआले होते. यावेळी शरद पवारांना त्यांच्या मुलीला मुख्यमंत्री बनवायचं आहे आणि उद्धव ठाकरेंना त्यांच्या मुलाला राजकारणात पुढे आणायचं आहे, जर पवारांनी मुलीच्या ठिकाणी अजित पवारांना संधी दिली असती आणि उद्धव ठाकरेंनी जर एकनाथ शिंदे यांना संधी दिली असती तर राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष फुटलेच नसते, असा दावाअमित शाहयांनी केला.

धुळे लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचेउमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ आज अमित शाह यांची सभा पार पडली. यादरम्यान अमित शाह यांनी 'एबीपी माझा'ला मुलाखत दिली.



यावेळी अमित शाह यांनी महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. शरद पवार जर त्यांच्या मुलीच्या जागी अजित पवारांनी संधी दिली असती आणि उद्धव ठाकरे यांनी जर एकनाथ शिंदे यांना संधी दिली असती, तर त्यांचा पक्ष कधीच फुटला नसता. पवार-ठाकरेंच्या मुला-मुलींमुळे त्यांचे पक्ष फुटले आणि त्याचा आरोप मात्र भाजपावर लावला जातोय, असा थेट आरोप अमित शाह यांनी केला.याचबरोबर, अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. गेल्या निवडणुकीत त्यांनी माझ्यासमोर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराला सहमती दर्शविली होती.

निवडणुकीनंतर त्यांच्या मनात मुख्यमंत्री बनण्याचा मोह आला. त्याला आम्ही काही करू शकत नव्हतो. त्यांचा तो व्यक्तिगत निर्णय होता. परंतु बाळासाहेबांच्या विचारांना सोडून ते काँग्रेस आणि शरद परवारांसोबत गेले. आज औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर झाले आहे. त्याला विरोध करणाऱ्यांसोबत जाऊन बसले आहेत. त्यामुळे आज बाळासाहेबांचा आत्मा दु:खी झाला असेल की नाही, असा सवाल करत अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.दरम्यान, धुळे लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ आज अमित शाह यांची सभा पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी ज्यांचं नाव घेणे सोडले आहे. त्या सावरकरांना माझा नमस्कार.

या निवडणुकीत एकीकडे १२ हजार कोटींचे घोटाळे करणारे आणि दुसरीकडे २३-२३ वर्ष मुख्यमंत्री राहिलेले नरेंद्र मोदी आहेत. एकीकडे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले तर दुसरीकडे चहा विकणारे नरेंद्र मोदी आहेत. राम मंदिराच्या मुद्द्याला काँग्रेस आणि शरद पवारांनी ७०-७० वर्ष अडकवले. ते राम मंदिर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी साकारले, असे अमित शाह म्हणाले.

# कलम ३७० हटवल्यानंतर पहिल्यांदाच श्रीनगरमध्ये सर्वाधिक मतदान



**राजदंड न्युज नेटवर्क** :लोकसभा निवडणुकीसाठी आज चौथ्या टप्प्यातील मतदान पार पडले. विशेष म्हणजे, कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये होत असलेल्या पहिल्याच निवडणुकांबाबत लोकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. २०२४ मध्ये पहिल्यांदाच तीन दशकांहून अधिक काळापासून दहशतवादाने त्रस्त असलेल्या श्रीनगरमध्ये रेकॉर्डब्रेक मतदान झाले. केंद्रातील मोदी सरकारने २०१९ साली राज्यातून कलम ३७० हद्दपार केले होते. यासोबतचजम्मू-काश्मीरआणि लडाख, या दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती झाली. त्यनंतर पहिल्यांदाच येथे निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांबाबत मतदारांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीनगर भागात सायंकाळी ५ वाजेपर्यंत ३५.७५% मतदान झाले. हा गेल्या पंचवीस वर्षातील सर्वोच्च आकडा आहे.

रेकॉर्डब्रेक मतदान

यापूर्वी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत येथे १४.१ टक्के, २०१४ मध्ये २५.९ टक्के, २००९ मध्ये २५.०६ टक्के, २००४ मध्ये १८.०६ टक्के आणि १९९९ मध्ये ११.९ टक्के मतदान झाले होते. त्याआधी जम्मू-काश्मीरमधील दहशतवादग्रस्त भागात अनेकवेळा निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या होत्या. म्हणजेच यंदाच्या निवडणुकीत या भागात सर्वाधिक मतदान झाले आहे.

दहशतवाद्यांची भीती नसल्यामुळे लोकांनी मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडून मतदान केले.यावेळी श्रीनगर जागेसाठी २४ उमेदवार असून, मतदारसंघात एकूण १७.४८ लाख मतदार आहेत.

लडाख वेगळा झाल्यानंतर जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशात लोकसभेच्या पाच जागा आहेत. यात - बारामुल्ला, श्रीनगर, अनंतनाग-राजौरी, उधमपूर आणि जम्मू. अनंतनाग-राजौरीमध्ये ७ मे रोजी निवडणुका होत्या, पण त्या पुढे ढकलण्यात आल्या. आता २५ मे रोजी येथे निवडणूक होणार आहे. विशेष म्हणजे, काश्मीरमध्ये दहशतवादाचे युग सुरू झाल्यानंतर, म्हणजे गेल्या ३५ वर्षांत पहिल्यांदाच कोणत्याही संघटनेने निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केलेली नाही.



# राहुल गांधींचे आव्हान भाजपने स्वीकारले

**राजदंड न्युज नेटवर्क :** सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या दोन माजी न्यायाधीशांसह एका पत्रकाराने काँग्रेस नेते राहुल गांधीआणि पंतप्रधान मोदी यांना एकाच मंचावर चर्चेसाठी आमंत्रित केले होते.राहुल गांधीयांनीही हे अमंत्रण स्वीकारले आणि पंतप्रधान मोदींना एका मंचावर येण्याचे आव्हान दिले. यानंतर आता भारतीय जनता युवा मार्चचे राष्ट्रीय अध्यक्ष तेजस्वी सूर्या यांनी राहुल यांचे आव्हान स्वीकारले असून, याबाबत एक पत्रही लिहिले आहे.

तेजस्वी सूर्या यांनी द वर पत्र शेअर करताना लिहिले की, 'प्रिय राहुल गांधी, भारतीय जनता युवा मोर्चने आमचे उपाध्यक्ष अभिनव प्रकाश यांना तुमच्याशी चर्चा करण्यासाठी नियुक्त केले आहे. अभिनव प्रकाश हे पासी (एससी) समाजातील तरुण आणि सुशिक्षित नेते आहेत. रायबरेलीमध्ये त्यांचा समाज सुमारे ३० टक्के आहे. हा राजकीय वंशज आणि सामान्य तरुण यांच्यातील समृद्ध चर्चा असेल.

निवृत्त न्यायमूर्ती मदन बी लोकूर, न्यायमूर्ती अजित पी शाह आणि ज्येष्ठ संपादक एन राम यांनी गेल्या आठवड्यातकाँग्रेसचेमाजी अध्यक्ष गांधी आणि पंतप्रधानांना पत्र लिहून लोकसभा निवडणुकीतील प्रमुख मुद्द्यांवर चर्चेसाठी आमंत्रित केले होते. यानंतर राहुल गांधी यांनी ते अमंत्रण स्वीकारले, पण भाजपकडून कुठलीही प्रतिक्रिया आली नव्हती. यावरुन काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदींवर टीकाही केली होती. पण, आता भाजपने हे आमंत्रण स्वीकारुन राहुल गांधींनाच आव्हान दिले आहे.

# लवकरच होणार एअर इंडिया आणि विस्ताराचे मर्जर

## ७००० कर्मचाऱ्यांवर टांगती तलवार

**राजदंड न्युज नेटवर्क :** टाटा समूहाच्याएअर इंडिया आणि विस्तारा एअरलाइनचे विलीनीकरण या वर्षीच पूर्ण होणार आहे. या दोन्हीविमानकंपन्यांच्या सीईओंनी सोमवारी एकत्र बैठक घेऊन यासंदर्भातील योजनेला अंतिम रुप दिले. याशिवाय दोन्ही सीईओंनी कर्मचाऱ्यांसोबत प्रदीर्घ टाउनहॉल बैठकही घेतली. यामध्ये या विलीनीकरणाबाबत कर्मचाऱ्यांनाही विश्वासात घेण्यात आले. याशिवाय सुमारे ७ हजार कर्मचाऱ्यांच्या भवितव्याबाबतही आराखडा निश्चित करण्यात आला आहे.एअर इंडियाआणि विस्तारा एअरलाइन्समध्ये मिळून २३,५०० कर्मचारी आहेत.

७००० कर्मचाऱ्यांना फिटमेंट अंतर्गत काम दिले जाईल

मीडिया रिपोर्ट्सनुसार, एअर इंडियाचे सीईओ आणि एमडी कॅम्पबेल विल्सन आणि विस्तारा एअरलाइन्सचे सीईओ विनोद कन्नन म्हणाले की, विलीनीकरणानंतर आमच्या संसाधनांमध्ये वाढ होईल. तसेच, आम्ही जगातील अनेक मार्गांवर आमच्या सेवा देऊ शकू. सुमारे ७००० कर्मचाऱ्यांना फिटमेंट अंतर्गत विविध नोकऱ्या दिल्या जातील. त्यांचे फिटमेंट जूनअखेर पूर्ण होईल. त्यांच्या भूमिकाही एकाच वेळी ठरवल्या जातील. या कामात पारदर्शकता ठेवण्यासाठी जागतिक सल्लागार कंपनीचीही मदत घेतली जाणार आहे. यामध्ये उद्योग मानकांचीही पूर्ण काळजी घेतली जाईल.नव्या रचनेत कोणाशीही भेदभाव केला जाणार नाही. आगामी योजना डोळ्यांसमोर ठेवून कंपनीची संरचना तयार करण्यात येणार आहे. यात कोणाशीही भेदभाव केला जाणार नाही, असे आश्वासन दोन्ही प्रमुखांनी कर्मचाऱ्यांना दिले. भूमिका ठरवताना पात्रता आणि कार्यक्षमता हा निकष असेल. या दोन्ही कंपन्या एकत्र आल्यामुळे कर्मचाऱ्यांनाही स्थैर्य मिळणार आहे. विलीनीकरणाबाबत कोणत्याही कर्मचाऱ्याच्या मनात शंका राहू नये, यासाठी येत्या काळात अनेक

# भारताचा इराणसोबत मोठा करार

## चीन आणि पाकिस्तानला बसणार मोठा झटका

**राजदंड न्युज नेटवर्क :** भारत आणि इराणमध्ये एक मोठा करार झाला आहे. हा करारइराणमधीलचाबहार बंदराशी संबंधित आहे. या करारांतर्गतभारतपुढील १० वर्षांसाठी इराणचे चाबहार बंदर हाताळणार आहे. केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी ही माहिती दिली. भारत-इराण संबंध आणि प्रादेशिक संपर्कासाठी हा करार ऐतिहासिक क्षण असल्याचे त्यांनी वर्णन केले. दरम्यान, या करारामुळे पाकिस्तान आणि चीनला मोठा झटका बसला आहे.

**करार किती महत्त्वाचा आहे?**

चाबहारमध्ये दोन बंदरे शाहिद कलंतरी आणि शाहिद भेष्टी आहेत. शिपिंग मंत्रालयाचे इंडिया पोर्ट्स ग्लोबल हे शाहिद बहिष्टी हाताळतात. या बंदराचे काम आधीपासून भारत हाताळत होता. पण हा अल्पकालीन करार होता. त्याचे वेळोवेळी नूतनीकरण करावे लागायचे. मात्र आता १० वर्षांसाठी दीर्घकालीन करार करण्यात आला आहे. या दीर्घकालीन करार करण्याबाबत अनेक वर्षांपासून दोन्ही





देशांमध्ये चर्चा सुरू होती.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे २०१६ मध्ये इराणला भेट दिली होती, तेव्हा त्यांनी चाबहार बंदरासाठी ५५० मिलियन खर्च करण्याची घोषणा केली होती. सध्या या कराराअंतर्गत इंडिया पोर्ट्स ग्लोबल चाबहार बंदरात सुमारे १२० मिलियन डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. इराण, अफगाणिस्तान आणि मध्य आशियातील देशांमध्ये मालाची वाहतूक करता यावी, यासाठी भारत चाबहार बंदराचा एक भाग विकसित करेल. नवीन करारामुळे पाकिस्तानच्या कराची आणि ग्वादर बंदरांना बायपास करुन इराणमार्गे दक्षिण आशिया आणि मध्य आशियात व्यापारी मार्ग खुला होईल.चाबहार बंदर किती महत्त्वाचे आहे?

२००३ मध्ये इराणचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष सय्यद मोहम्मद खतामी भारत दौऱ्यावर आले होते. त्यांच्या दौऱ्यात भारत आणि इराणमध्ये अनेक महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या, ज्यामध्ये चाबहार प्रकल्पाचाही समावेश आहे. चाबहार प्रकल्पात दोन स्वतंत्र बंदरे बांधली जात आहेत. भारत शाहिद बहिष्टी बंदरात गुंतवणूक करत आहे. चाबहार बंदराचे स्थान हे धोरणात्मक दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे आहे. चाबहार हे इराणच्या दक्षिण-पूर्व किनाऱ्यावर आहे. चाबहार जिथे आहे, तिथे पाकिस्तानची सीमादेखील असू हे पाकिस्तानमध्ये बांधल्या जात असलेल्या ग्वादर बंदराजवळही आहे. चीनने बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत ग्वादर बंदर बांधण्यास सुरुवात केल्यामुळे चाबहार बंदराचे महत्त्व आपोआप वाढले आहे.

इराणमध्ये बांधल्या जाणाऱ्या चाबहार बंदरामुळे चीन आणि पाकिस्तानला झटका बसणार आहे. ग्वादर बंदर चीनच्या हातात असल्यामुळे चाबहार बंदर भारताकडे असणे फायद्याचे आहे.

चाबहार बंदर आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर शी जोडले जाईल. या कॉरिडॉर अंतर्गत भारत, इराण, अफगाणिस्तान, आर्मेनिया, अझरबैजान, रशिया, मध्य आशिया आणि युरोपमध्ये जहाजे, रेल्वे आणि रस्त्यांचे ७,२०० किमी लांबीचे जाळे तयार केले जाईल. यामुळे युरोप आणि रशियामध्ये भारताचा प्रवेशही सुलभ होईल.

## मोसमी वारे अंदमानात कधी दाखल होणार?

**पुणे :** गेले दोन महिने उकाड्याने हैराण झाल्यानंतर आता मोसमी पावसाची उत्सुकता निर्माण झाली आहे. नैऋत्य मोसमी वारे दक्षिण अंदमान आणि निकोबार बेटांवर १९ मे रोजी दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

दक्षिण हिंद महासागरात वाऱ्याची प्रती चक्रीय स्थिती निर्माण होऊन वारे उत्तरेला वाटचाल करतात. पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे विषुववृत्त पार केल्यानंतर त्यांची वाटचाल नैऋत्य दिशेने सुरू होते. अंदमानमध्ये नैऋत्य दिशेने वारे दाखल होतात. या वाऱ्यांमुळे ढगांची निर्मिती होऊन पाऊस पडतो. अंदमानमध्ये सुमारे २४ तास पाऊस पडल्यावर नैऋत्य मोसमी वारे अंदमानमध्ये दाखल झाल्याचे जाहीर केले जाते. सर्वसाधारणपणे मोसमी वारे सरासरी २२ मे रोजी अंदामानात दाखल होतात. त्यानंतर आठवड्याभरात, १ जूनच्या सुमारास देशाच्या प्रवेशद्वाराजवळ म्हणजे केरळमध्ये दाखल होतात.

# पराभवाच्या भीतीने आणि नैराश्यातून रवींद्र धंगेकरांचे आरोप सुरू : रुपाली चाकणकर


**राजदंड न्युज नेटवर्क :** पुणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार माजी महापौर मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर, वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे, एमआयएमकडून माजी नगरसेवक अनिस सुंडके हे चार उमेदवार आहेत. तर आज सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली असून सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४४.९ टक्के इतके मतदान झाले आहे. तसेच शहरातील प्रत्येक मतदान केंद्रावर नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह पाहण्यास मिळाला आहे. मात्र अद्यापही काही मतदान केंद्रावर मतदान सुरू आहे. ही मतदान प्रक्रिया पुढील काही वेळेत पूर्ण होऊन अंतिम आकडेवारी समोर येईल. मात्र या मतदानावेळी देखील राजकीय नेत्यांकडून आरोप प्रत्यारोप सुरूच असल्याचे पाहण्यास मिळत आहे. भाजप कार्यकर्त्यांमार्फत पैशांचे वाटप सुरू असल्याचा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केल्याचे पाहण्यास मिळाले. त्या आरोपाचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी चांगलाच समाचार घेत रवींद्र धंगेकर यांना सुनावल्याचे पाहण्यास मिळाले.

त्या आरोपावर रुपाली चाकणकर म्हणाल्या की, राज्यभरात महायुतीने जनाधार असलेले उमेदवार दिले आहेत. त्यामुळे उमेदवारी जाहीर झाल्यापासून विरोधक आमच्या उमेदवारावर आरोप करीत आलेले आहेत.

# देशात चौथ्या टप्प्यात ६३.०४ टक्के मतदान

**राजदंड न्युज नेटवर्क** :लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात १० राज्यातील ९६ लोकसभा मतदारसंघासाठी आज मतदान पार पडले. चौथ्या टप्प्यात एकूण ६३.०४ टक्के नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या टप्प्यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक मतदानाची नोंद झाली. तर जम्मू काश्मीरमध्ये सर्वात कमी मतदान झाल्याचं बघायला मिळालं.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, चौथ्या टप्प्यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७६.०२ टक्के नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. तर जम्मू काश्मीरमध्ये सर्वात कमी म्हणजेच ३६.८८ टक्के मतदानाची नोंद



झाली. याबरोबरच आंध्र प्रदेशमध्ये ६८.२० टक्के, बिहारमध्ये ५५.९२ टक्के, महाराष्ट्रात ५२.९३ टक्के झारखंडमध्ये ६४.३० टक्के आणि मध्य प्रदेशमध्ये ६९.१६ टक्के मतदान झाले. याशिवाय ओडिशात ६४.२३ टक्के, तेलंगणात ६१. ५९ टक्के, उत्तर प्रदेशमध्ये ५८.०२ टक्के मतदान झाल्याचं बघायला मिळालं.

महाराष्ट्रात ५२.४९ टक्के मतदान

चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ११ लोकसभा मतदार संघात मतदान पार पडले. यापैकी नंदूरबारमध्ये सर्वाधिक ६०.६० टक्के नागरिकांनी मतदान केले, तर शिरुरमध्ये सर्वात कमी ४३.८९ टक्के मतदानाची नोंद झाली. याशिवाय जळगावमध्ये ५१.९८ टक्के, रावेरमध्ये ५५.३६ टक्के, औरंगाबादमध्ये ५४.०२ टक्के, मावळमध्ये ४६.०३ टक्के, पुण्यात ४४.९० टक्के, अहमदनगरमध्ये ५३.२७ टक्के, शिर्डीत ५५.२७ टक्के, बीडमध्ये ५८. २१ टक्के आणि जालनामध्ये ५८.८५ टक्के मतदान झाल्याचं बघायला मिळालं.

दरम्यान, आज ( सोमवार १३ मे ) सकाळी ७ वाजता चौथ्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात झाली होती. चौथ्या टप्प्यात एकूण १० राज्यातील ९६ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले.

# संपादकीय

## संवाद मतदाराचा मतदाराशी!

लोकशाहीच्या मतोत्सवातील तीन टप्पे पार पडले आहेत. चौथा टप्पा १३ तारखेला आहे. पहिल्या तीन टप्प्यात मतदान कमी का झाले आणि मतदानाच्या आकड्यांत नंतर वाढ का झाली, हे प्रश्न अनुत्तरीत आहेत. निवडणूक आयोगासह राजकीय पक्षांनी मतदान जास्त व्हावे, यासाठी जादा प्रयत्न केले, बूथस्तरापर्यंत यंत्रणा राबवल्या; परंतु तरीही मतदान वाढले नाही. मतदार आपले हक्क का डावलतो आहे, आपले सरकार निवडण्याबाबत त्याला इतकी उदासीनता का आली आहे, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. त्यातही अप्रगत आणि ग्रामीण भागात मतदान वाढत असताना प्रगत राज्ये आणि शहरी भागात तुलनेने मतदान कमी होत आहे. ही चिंतेची बाब आहे. लोकसभा निवडणुकीच्या या उत्सवात हिंदू, मुस्लिम, काळे-गोरे, परराष्ट्र धोरण, पाकिस्तानची आण्विक शक्ती, अंबानी-अदानी अशा सामान्यांशी निगडीत नसलेल्या मुद्यांवर जेव्हा राजकीय पक्ष धुरळा उडवतात, तेव्हा पायाभूत सुविधा, शेतीविषयक धोरणे, महागाई, बेरोजगारी आदी मूलभूत मुद्यांना निवडणुकीत फारसे स्थान नसल्याने मतदारांची उदासीनता वाढली असेल, तर त्याचा राजकीय पक्षांनी गांभीर्याने विचार करायला हवा. नागालँडच्या चार जिल्ह्यांतून पहिल्या टप्प्यात सुरू झालेला निवडणूक बहिष्कार आता गुजरात आणि महाराष्ट्रात पोहोचला आहे. त्यातही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे गृहराज्य असलेल्या गुजरातच्या २५ लोकसभा मतदारसंघात नोंदणी केलेल्या ४.७९ कोटी पात्र मतदारांपैकी १.९० कोटी मतदारांनी मतदान का केले नाही, हा प्रश्न विचार करायला लावणारा आहे. मतदार मतदान करण्यास कशामुळे प्रवृत्त होतो? या प्रश्नावर येण्याआधी, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे हे आपण का विसरतो, याचाही विचार करायला हवा. निवडणूक आयोगापासून सरन्यायाधीश आणि सरसंघचालकांपर्यंत सगळेच पहिल्या मतदान करण्यासाठी पहिल्या टप्प्यापासून आग्रही आहेत. देशात मतदान अद्याप अनिवार्य करण्यात आलेले नाही, ते केवळ ऐच्छिक आहे. त्यामुळे मतदान केले नाही, तरी काही फरक पडत नाही, ही बेपर्वा वृत्ती मतदान न वाढण्यामागचे प्रमुख कारण आहे. राजकीय पक्षांतील सध्याची नळावरची भांडणे मतदारांत उदासीनता निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहे. मतदानाच्या टक्केवारीवरून असे दिसून येते, की सरासरी ४० टक्के मतदारांना मतदान करण्याची इच्छा नसते. हे मतदार कोण आहेत आणि त्यांच्या या अनिच्छेने कोणाला फायदा होतो आणि कुणाला तोटा होतो हे जाणून घेण्याची गरज आहे.

मतदान करणारे ६० टक्के मतदार मतदान का करतात आणि त्यांना मतदान केंद्रांवर जाण्याची इच्छा का होते, त्यांना मतदान केंद्रापर्यंत कोण नेते असे अनेक प्रश्न यानिमिताने उपस्थित होतात. ही निवडणूक लोकांना मतदानासाठी प्रवृत्त करू शकेल अशा कोणत्याही मुद्द्यावर आधारित आहे का? आजवर कोणत्याही पक्षाने मांडलेला मुद्दा कायमस्वरूपी कार्यरत होताना दिसतो का, या प्रश्नांतच मतदान कमी का होते, याचे उत्तर दडलेले आहे. देशभरातील निवडणुका मतदारांना एकत्र आणू शकतील असे कोणतेही राजकीय किंवा सामाजिक वातावरण नाही. २०१४ प्रमाणे मोदींसारख्या करिष्माई व्यक्तीला दिल्लीच्या सत्तेवर बसवण्यासाठी जो उत्साह होता आणि २०१९ च्या बालाकोटच्या घटनेनंतर पाकिस्तानविषयी जी रागाची तिडीक मतदारांना मतदान केंदापर्यंत घेऊन गेली, तशी स्थिती सध्या नक्कीच नाही. प्रथमच राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न उच्चभ्रू कक्षांमधून बाहेर पडला आणि सार्वजनिक समस्या बनला. निवडणुकांना मुद्दा बनवणे हे खरे तर सत्तेसाठी विरोधकांचे काम आहे. यामध्ये विरोधी पक्ष सपशेल अपयशी ठरला आहे, तर सरकार या वेळी विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना मैदानात उतरवताना दिसत आहे आणि त्याचे सकारात्मक मुद्दे चर्चेतून गायब आहेत. गेल्या काही वर्षांतील महत्त्वाच्या घटनांवर नजर टाकली, तर लक्षात येईल, की सरकारने राबवलेल्या निर्णयांमुळे लोकांना त्यांच्या अनुभवांचा विचार करायला किंवा आनंद-दु:ख साजरे करायला वेळ मिळाला नाही. २०१७ मध्ये देशात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) मध्यरात्री लागू करण्यात आला. लहान-मोठे व्यापारी, दुकानदार आदींना त्याची सवय व्हायला खूप वेळ लागला. प्रकरण पुन्हा रुळावर येईपर्यंत २०१८ मध्ये नोटाबंदी झाली होती. यानंतर समाजाला अडचणींचा दीर्घकाळ सामना करावा लागला. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याविरोधातील आंदोलनांचा दैनंदिन जीवनावर परिणाम होत असताना ते संपले. आंदोलन संपल्यावर आरोग्य आणीबाणी लागू झाली, म्हणजे टाळेबंदी. टाळेबंदीत सरकारने गरीबातल्या गरीबांसाठी काही केले; परंतु देशातील ४० टक्के मध्यमवर्ग सामाजिक-राजकीय प्रक्रियेपासून दूर गेला. २०२१ नंतर राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी ब्यूरो (एनसीआरबी) च्या आत्महत्येचे आकडे पाहिले, तर एक भयावह स्थिती पुढे येते. नोकरदार, उद्योजकांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले. तरुणांच्या आत्महत्या वाढल्या. एकतर कोरोनानंतर नोकऱ्यांच्या उपलब्धतेचे प्रमाण कमी झाले. पगार कमी झाले आणि कामाचे तास वाढले. या सर्वांचा परिणाम राजकीय पक्षांविषयीची लोकांची भावना बदलली. आरोप-प्रत्यारोपात हरवलेल्या निवडणुकीकडे अनेक घटक पाठ फिरवून आपल्याच कोषांत रमले. आधुनिक इतिहासात पहिल्यांदाच उद्योजक आणि तरुणांनी आत्महत्यांमध्ये शेतकऱ्यांना मागे टाकले आहे. हे असे लोक होते, ज्यांच्याकडे शेतकऱ्यांप्रमाणेच स्वत:साठी पुरेसे अन्न पिकवण्यासाठी जमीनही नव्हती. या आत्महत्या अजूनही सुरूच आहेत. नोएडामध्ये गरिबीशी झुंजणाऱ्या एका माध्यमकर्मीने विष प्राशन करून आत्महत्या केली. इतरांच्या समस्या जगाच्या वेशीवर टांगणाऱ्यांना कुणीही वाली राहिला नाही.

गेल्या चार वर्षांत आत्महत्येचे स्वरूप बदलले आहे. आता लोक एकटे नाही, तर आपल्या कुटुंबासह सामूहिक आत्महत्या करत आहेत. निम्नवर्गीय आणि मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणावर सामाजिक चिंतेपासून दूर गेला आणि त्यांचे कुटुंब, घर आणि खर्च व्यवस्थापित करण्यापुरते त्याचे विश्व मर्यादित झाले. सरकार म्हणते, की प्रत्येकी पाच किलो रेशन देऊन ऐंशी कोटी लोकांना वाचवले; परंतु त्यातील फोलपणा लगेच लक्षात येतो.

आता सरकार कुठूनही आणि काहीही आकडेवारी काढून तोंडावर मारून मोकळी होत असली, तरी प्रत्यक्षात फिल्डवर ग्राऊंड लेव्हलला काय स्थिती आहे, हे सरकारचे दूत म्हणजे सत्ताधारी पक्षाचे लोकही सरकारला सांगत नाही. आत्ममग्न वृत्तीत ते आहे आणि विरोधक तर खाती गोठवण्यापासून तपास यंत्रणांच्या गैरवापरामुळे मानसिक दडपणाखाली असल्याने देशात काय चालले आहे, याची त्यांना पर्वा नाही. सरकारी रेशनवर जगणारे लोक पन्नास कोटी असतील असे गृहीत धरले, तर अंदाजे ९९ कोटी मतदारसंख्येपैकी ते निम्मे आहेत. एकामागून एक संकटातून वाचलेले हे लोक गेल्या काही काळापासून थांबून स्वत:चाच विचार करत आहेत. एकामागून एक मेगा इव्हेंट्स आयोजित करणाऱ्या सरकारने नकळत त्यांना स्वत:चा विचार करायला पुरेसा वेळ दिला आहे. सत्ताधारी पक्षातील सर्वसामान्य कार्यकर्तेही विचार करू लागले आहेत. जेव्हा लोक विचार करतात, तेव्हा त्यांना जुन्या गोष्टी आठवतात. ते अस्वस्थ होतात. आमच्या पक्षाच्या राजवटीत सत्य बोलण्याची आणि त्यासाठी लढण्याची संधी पूर्वीपेक्षा कमी झाली आहे. सरकारला तुम्हाला आयुष्यभर भिकारीच ठेवायचे आहे.''

# पुणे, शिरूर, मावळसाठी तयारी पूर्ण, शांततेत निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

**राजदंड न्युज नेटवर्क :** ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांना रांगेत उभे न करता त्यांना मतदानासाठी प्राधान्य देण्यात येणार पुणे, शिरूर, मावळसाठी तयारी पूर्ण, शांततेत निवडणुकीसाठी प्रशासन सज्जपुणे: जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात मावळ,पुणेआणि शिरूर लोकसभा मतदासंघांकरिता मतदान होत आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची पूर्ण तयारी झाली आहे. या निवडणुका पारदर्शक वातावरणात आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती जिल्हानिवडणूकअधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयात लोकसभा सार्वत्रिकनिवडणूककार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर उपस्थित होत्या. दिवसे म्हणाले, 'जिल्ह्यात २८ एप्रिलपासून ६८ लाख ७३ हजार मतदार चिठ्ठ्यांचे वाटप करण्यात आले आहे. त्यात पुणे मतदारसंघात ८१ टक्के, शिरूरमध्ये ७३ टक्के तर मावळमध्ये ८३ टक्के चिठ्ठ्यांचे वाटप करण्यात आले आहे. पुणे शहरात ५ पेक्षा जास्त मतदानकेंद्र असणाऱ्या ५१० इमारती आहेत. पुणे लोकसभा मतदारसंघाअंतर्गत वडगावशेरी विधानसभा मतदारसंघात २ तर कोथरूड मतदारसंघात २ सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. त्यात वडगावशेरीत एकूण ५ हजार ६४१ आणि कोथरुड विधानसभा मतदारसंघात ८ हजार ८ मतदार आहेत.'पुणे लोकसभा मतदारसंघात १२ ड अर्थात घरबसल्या मतदानासाठी अर्ज भरलेल्या ४६३ पैकी ४४० ज्येष्ठ नागरिक, ४२ पैकी ४१ दिव्यांग नागरिक तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघात ३८१ पैकी ३५१ ज्येष्ठ नागरिक, ८७ पैकी ८४ दिव्यांग नागरिक आणि मावळ लोकसभा मतदारसंघात २६३ पैकी २४५ ज्येष्ठ नागरिक व ४५ पैकी ४० दिव्यांग नागरिकांनी घरूनच टपाली मतदानाचा हक्क बजावला आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघात १० व मावळ लोकसभा मतदारसंघात ३ अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांनी टपाली मतदानाचा हक्क बजावला आहे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील पुणे, शिरूर व मावळ मतदारसंघात १६ संवेदनशील मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची तयारी झाली आहे. त्यात पुणे मतदारसंघात १०, शिरूरमध्ये १ तर मावळमध्ये ५ मतदान केंद्र संवेदनशील आहेत. माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीने १०० पेक्षा जास्त जाहिरातींचे प्रमाणीकरण केले आहे. समाजमाध्यमांवर प्रमाणीकरण न करता सुरू असलेल्या ३५ पेक्षा अधिक उमेदवारांना नोटीस देण्यात आल्या आहेत.मतदान केंद्रावर केवळ याच व्यक्तींना प्रवेशमतदान केंद्रासाठी ठरवून दिलेल्या मतदारांव्यतिरिक्त मतदान अधिकारी, प्रत्येक उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी व प्रत्येक उमेदवाराचा यथोचितरीत्या नियुक्त केलेला एकावेळी एकच मतदान प्रतिनिधी, भारत निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या प्रसारमाध्यमातील व्यक्ती, महत्त्वाचे, संवेदनाक्षम मतदान केंद्र असल्यास त्या ठिकाणी सूक्ष्म निरीक्षक, व्हिडीओ ग्राफर, छायाचित्रकार, वेब कास्टिंग करणारा कर्मचारी वर्ग, मतदाराबरोबर असलेले लहान बाळ, अंध किंवा आधाराशिवाय चालू न शकणाऱ्या दिव्यांग मतदारांबरोबर असलेली व्यक्ती, मतदारांची ओळख पटण्यासाठी किंवा मतदान करून घेण्याच्या कामी मतदान केंद्राध्यक्ष यांना अन्यप्रकारे साहाय्य करण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष वेळोवेळी ज्यांना प्रवेश देतील अशा व्यक्तींनाच मतदान केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे.

दिव्यांग व वयोवृद्धांसाठी मतदान केंद्रावर विशेष सुविधादिव्यांग व वयोवृद्ध मतदारांसाठी मतदान केंद्रांवर विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. या तीन मतदारसंघांत १ हजार ७७० इमारतींमध्ये मतदान केंद्रांची सोय करण्यात आली असून प्रत्येक मतदान केंद्रावर व्हीलचेअर ठेवण्यात येणार आहेत. त्यानुसार २ हजार ३०० व्हीलचेअरची सोय उपलब्ध असेल. ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांना रांगेत उभे न करता त्यांना मतदानासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर येणे शक्य नसल्यास त्यांच्यासाठी वाहनांची तसेच सहायकांची विशेष व्यवस्था करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिकमध्ये, अंतिम टप्प्यातील रणनीती ठरणार

**नाशिक :** लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात नाशिकचे मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नाशिकमध्ये दाखल होणार असून महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा करून अंतिम रणनीती आखली जाणार आहे. दरम्यान ते विविध संस्था प्रतिनिधींशी चर्चा देखील करणार आहेत.



लोकसभा निवडणुकीतील चार टप्प्यातील मतदान आटोपत असताना आता पाचव्या टप्प्याची तयारी सुरू आहे त्यामुळे सर्व राजकीय नेत्यांचे नाशिकमध्ये लक्ष आहे. येत्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उद्धव सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह अनेक नेत्यांच्या सभा होणार आहेत.

दरम्यान, आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिक मध्ये येणार आहेत सायंकाळी साडेसहा वाजता ते शैक्षणिक संस्था क्रीडा संस्था तसेच अन्य सामाजिक संस्था प्रतिनिधींशी चर्चा करणार आहेत तर रात्री साडेआठ वाजता नाशिक मधील उद्योजक संघटनांशी ते चर्चा करणार आहेत. उद्योग मंत्री उदय सामंत हे देखील त्यांच्या समवेत असणार आहेत. त्याचबरोबर मुख्यमंत्री हे महायुतीतील घटक पक्षातील नेत्यांशी चर्चा देखील करणार आहेत.

# खरिप पिकासाठी पन्हाळा तालुका सज्ज

**पन्हाळा :** मृग नक्षत्रात पावसाचे चांगले संकेत मिळत आहेत. हंगम पुर्व पावसाची अजुनही प्रतीक्षा करावी लागते आहे. त्यामुळे शेत, शिवार परीसरात शेतकरी कुठेही तयारी करताना दिसत नाहीत तरी सुद्धा पन्हाळा तालुका कृषी विभाग व पंचायत समिती कृषी विभाग खरीप हंगामाच्या नियोजनासाठी सज्ज झाला आहे. खरीप हंगाम यशस्वी करणेसाठी कृषी विभागा शेतकऱ्यांना मदत करत आहे. अशी माहिती तालुका कृषी अधिकारी श्रीमती के.एम.घोलप व कृषी अधिकारी पंचायत समिती पन्हाळा एस. व्ही. शिंदे यांनी सांगितले पन्हाळा तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान दोन हजार मिलिमीटर इतके चांगले असलेने पन्हाळा तालुक्यातील शेतकऱ्यां बरोबर शेतकऱ्यांना लागणारी बी-बियाणे, खते, किटकनाशके इ.शेती साहित्य खरेदीसाठी व हंगामपुर्व मशागतीसाठी शेतकऱ्यां कडुन नियोजन सुरु आहे.

पन्हाळा तालुक्यातील खरीप हंगाम मध्ये पिकनिहाय क्षेत्र भात- ९३७० हेक्टर, ज्वारी- २४०,नागली- ३७०,मका ५०, इतर तृणधान्य -१२ हेक्टर असे एकुण -१००४२ हे . तृणधान्य क्षेत्र आहे. तुर-३० हे, मुग-१४,उडीद-६ हे, इतर कडधान्य -१०२ हे असे एकुण -१५२ हे कडधान्य लागवडी खालील क्षेत्र आहे.तेलबियामध्ये खरीप हंगामात भुईमुग-३८५० हे, सोयाबीन- १९५०० हे, तीळ- २ हे. असे एकुण ५८०० हेक्टर तेलबिया खालील क्षेत्र आहे. चालु वर्षी पेरक्षेत्र उदिष्ट शंभर टक्के साध्य करणेसाठी कृषी विभाग प्रयत्नात आहे.

खरीप हंगामातील पेर क्षेत्रात बियाणे बदलाचे प्रमाणात भात बियाणे ३०६० क्विंटल, सोयाबीन ३९० क्विंटल, भुईमुग -१४५ क्विंटल, खरीप ज्वारी- ५४ क्विं, मका २८ क्विं. बियाणाची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

तालुक्यासाठी खरीप हंगामासाठी खताची मागणी पन्हाळा गटास युरिआ ४४८४ मे.टन , डीएपी -१२१२ मे.टन, सुपर फॉस्फेट -११५५ मे.टन , म्युरेट ऑफ पोटॅश -८२० मे टन , संयुक्त खते ५४०४ मे टन असे एकुण १३०७५ मे टन खत प्राप्त होणार आहे. तर शेतकरी सध्या भात बियाणात वाएसआर, शुभांगी, सारथी, पुनम, सोना, यशोदा या बियाणाची मागणी करत आहेत.

खरीप हंगामासाठी तालुक्यातील निविष्ठा विक्री केंद्र तपासणी करीता भरारी पथकाची स्थापना केली असुन या पथकामार्फत निविष्ठा विक्री केंद्र तपासणी होणार आहे.

तसेच शेतक-यांच्या अडीअडचणी सोडविणेसाठी तालुकास्तरावर तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. खरीप हंगाम यशस्वी होण्यासाठी शेतकऱ्यां बरोबर कृषी विभाग पण सक्रीय असल्याचे कृषी अधीकारी के.एम.घोलप व एस. व्ही.शिंदे यांनी सांगीतले

# फळभाज्यांच्या दरात वाढ, पालेभाज्यांच्या दरात घट



**पुणे :** घाऊक बाजारात मटार, ढोबळी मिरची, घेवड्याच्या दरात वाढ झाली. भुईमुग शेंग, शेवग्याच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. आवक वाढल्याने कोथिंबिर, मेथीच्या दरात अल्पशी घट झाली आहे.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (१२ मे) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ११० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १० ते १२ टेम्पो हिरवी मिरची, आंध्र प्रदेश, कर्नाटकातून चार हजार खोकी तोतापुरी कैरी, गुजरात, कर्नाटकातून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून ३ ते ४ टेम्पो घेवडा, पावटा ३ टेम्पो, तसेच बेळगावहून २ टेम्पो भुईमूग शेंग, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून ५ ते ६ टेम्पो शेवगा, हिमाचल प्रदेशातून ५ ट्रक मटार, मध्य प्रदेशातून ९ ते १० टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी आणि गवार प्रत्येकी ७ ते ८ टेम्पो, टोमॅटो १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ८ ते १० टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ८० ट्रक तसेच इंदूर, आग्रा आणि स्थानिक भागातून ४५ ट्रक बटाटा अशी आवक झाली.

कोथिंबीर, मेथी, कांदापात, चुक्याच्या दरात ५ ते १० टक्क्यांनी घट झाली. अन्य पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर दीड लाख जुडी, मेथीच्या ६० हजार जुडी अशी आवक झाली. घाऊक बाजारात शेकडा पालेभाज्यांचे दर कोथिंबीर - ८०० ते १५०० रुपये, मेथी - १००० ते १५००रुपये, शेपू - ८०० ते १००० रुपये, कांदापात - ८०० ते १२०० रुपये, चाकवत - ४०० ते ७०० रुपये, करडई - ३०० ते ७०० रुपये, पुदिना - ३०० ते ६०० रुपये, अंबाडी - ४०० ते ७०० रुपये, मुळा - ८०० ते १२०० रुपये, राजगिरा - ४०० ते ७०० रुपये, चुका - ५०० ते ८०० रुपये, चवळई - ४०० ते ७०० रुपये, पालक - ८०० ते १५०० रुपये असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# नारायणगाव येथे बिबट्याची मादी मृत अवस्थेत आढळली

**नारायणगाव :** नारायणगाव तालुका जुन्नर येथे बिबट्याची पूर्ण वाढ झालेली मादी मृत अवस्थेत आढळली.

आज रविवार दिनांक १२ रोजी दुपारी साडेचार वाजता राजेंद्र महादेव कोल्हे हे आपल्या उसाच्या शेतात कोल्हे मळा चारंग बाबा मंदिराजवळ पाहणी करत असताना त्यांना रस्त्याच्या मध्यभागी एक बिबट्याची मादी मृत अवस्थेत आढळली. याबाबतची माहिती वनपाल अनिता होले वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांना

मिळताच त्यांनी घटनास्थळी भेट दिली यावेळी आपदा मित्र सुशांत भुजबळ, ग्राम सुरक्षा दलाचे जवान अदित्य डेरे वन कर्मचारी खंडू भुजबळ यांनी बिबट्याला ताब्यात घेऊन विच्छेदनाकरिता माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्र येथे नेले.

या प्रसंगी राजेंद्र कोल्हे, रोहन शिंदे, महेंद्र कोल्हे, विश्वनाथ कोल्हे, हेमंत जाधव हे शेतकरी उपस्थित होते

दोन बिबट्यांच्या झटापटीमध्ये या मादीचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज वनविभागाच्या वतीने वर्तविण्यात आला.

# प्रा.डॉ. आनंद गिरीं 'समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात तसेच शेती - लोकसंस्कृती इतिहास या विषयावर लेखन करून प्रा. डॉ. आनंद गिरींनी गेली ४० वर्षे केलेल्या कार्याची दाखल घेत ए. सी.भारत सरकार कुटुंब परिवार व गार्गीज डी. आय डी फौडेशन - च्या वतीने रिटायर्ड सिनियर असिस्टंट डायरेक्टर भारतसरकार विठ्ठल मुरकेवार यांच्या हस्ते समाजभूषण राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानिन केले.या प्रसंगी व्यासपीठावर ए.सी हरिष पटेल, चिफ ए.सी. गव्हमेंट ऑफ इंडिया, ए.सी. अशोक येडेकर ऑल इंडिया ऑफीसर ए.सी. भारत सरकार व ए.सी. डॉ. मॅडी तामगावकर महाराष्ट्र कोल्हापूर डिव्हीजन ऑफीसर ए.सी. भारत सरकार व अभिनेत्री रेणुका सहाने उपस्थित होते.

प्रा.डॉ. आनंद गिरींनी गेली ४० वर्षे सांस्कृतिक व सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात जे कार्य केले आहे.या कार्याची पोच पावती म्हणून त्यांना हा पुरस्कार देणेत आला. त्यानी शाहीर व लोककलावंतांसाठी व्यासपीठ (रंगमंच) उपलब्ध करून देऊन त्यांचा मानसन्मान केला आहे. व कलाकारांची नवी पिढी तयार करणेस प्रोत्साहन दिले आहे. त्याचबरोबर त्यांचे मानधनाचाही प्रश्न सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. अनेकवेळा कुस्त्यांची मैदाने घेतली आहेत.

# के. पी. पाटील यांनी आव्हान स्वीकारले

## बिद्री साखर कारखान्याच्या लेखापरीक्षण आदेशाचे स्वागतच

**कोल्हापूर :** बिद्री साखर कारखान्याचे लेखापरीक्षण करण्याचा आदेश न्यायालयाने दिल्यानंतर विरोधकांनी याला सत्ताधाऱ्यांनी सामोरे जावे असे आव्हान काल दिले असताना त्याला भिडण्याची तयारी सत्ताधारी गटाने आज केली. बिद्री साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आणि त्यानंतर निवडणुकीच्या प्रचारात कारखाना व्यवस्थापन कोणत्याही प्रकारच्या लेखापरीक्षणास तयार असल्याचे अनेकदा जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाने होणाऱ्या लेखापरीक्षणाचे स्वागतच करत आहोत, असे प्रतिपादन कारखान्याचे अध्यक्ष, माजी आमदार के. पी. पाटील यांनी रविवारी केले. या प्रक्रियेत विरोधकांनी शासकीय यंत्रणेवर दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.



बिद्री साखर कारखान्याच्या लेखापरीक्षणास स्थगिती देण्याचा सहकार मंत्र्यांचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला. या अनुषंगाने अध्यक्ष के. पी. पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे कि, बिद्रीच्या निवडणुकीत कारखाना व्यवस्थापनाच्या कारभारावर टीका किंवा आरोप करण्यासाठी विरोधकांकडे कोणतेही मुद्दे उपलब्ध नव्हते. विरोधी मंडळींनी लेखापरीक्षणातील काही मुद्यांचा चुकीचा अर्थ लावून हवा तसा चौकशी अहवाल करणेसाठी शासकीय यंत्रणेवर दबाव आणून चुकीचा अहवाल तयार करुन घेतला. या अहवालानुसार चौकशी करुन कारखान्यावर प्रशासक मंडळ नेमण्याचे कुटील कारस्थान होते. याबाबत सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या लेखापरिक्षणास स्थगिती दिली होती. ती उच्च न्यायालयाने उठवली असून कारखान्यास दाद मागण्यासाठी चार आठवड्यांचा अवधी दिला आहे.

कारखान्यामध्ये आम्ही कोणताही चुकीचा कारभार केलेला नसल्याने लेखापरिक्षण करण्याच्या आदेशाचे आम्ही स्वागत करत आहोत. कारखाना प्रशासनाकडून सबंधीत लेखापरिक्षकांना सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल. लेखापरिक्षणामध्येही कारखान्याचा कारभार योग्य असल्याचे पुन्हा एकदा निदर्शनास येईलच, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# रवींद्र वायकर यांच्या प्रचारासाठी १०० तृतीयपंथीय



**मुंबई :** वायव्य मुंबईत तृतीयपंथीही लोकसभेच्या निवडणूकीच्या प्रचारात उतरले आहेत. महायुतीचे उमेदवार शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांच्या प्रचारासाठी १०० हून अधिक तृतीयपंथी उतरले आहेत. रविवारी १२ मे रोजी दिंडोशी विधानसभेत तृतीयपंथीयांनी घरोघरी जाऊन वायकर यांच्या प्रचाराला सुरूवात केली.

पश्चिम उपनगरात तृतीयपंथीयांची संख्या मोठी असून या समाजातील लोकांचे प्रश्नही अनेक वर्षांपासून सोडवलेले नाहीत. अगदी मूलभूत सुविधांपासून हा वर्ग वंचित आहे.

निवडणूकीच्या निमित्ताने या वर्गाने आपल्या समस्या उमेदवारांपर्यंत पोहोचवण्याचे ठरवले आहे. गेल्याच आठवड्यात याच भागातील काही तृतीयपंथी संघटनांनी महाविकास आघाडीचे ठाकरे गटाचे उमेदवार अमोल किर्तीकर यांची भेट घेतली होती व आपल्या समस्या मांडल्या होत्या. तर काही संघटनांनी वायकर यांची भेट घेतली होती. त्यानंतर वायकर यांनी या तृतीयपंथीयांना आपल्या प्रचारात सामावून घेतले आहे. रविवारी तृतीयपंथीयांनी सायंकाळी ५ ते ७ या वेळात क्रांतीनगर, रामलीला मैदान ते इंदिरानगर या भागात वायकरांचा प्रचार केला.

तृतीयपंथीयांसाठी कुठेच शौचालयाची व्यवस्था नसल्याची समस्या काही महिन्यांपूर्वी तृतीयपंथीयांनी वायकर यांच्याकडे मांडली होती. तेव्हा वायकर यांनी तातडीने गोरेगाव (पूर्व) आरे चेक नाका येथे उभारलेल्या उद्यानामध्ये तृतीयपंथीसाठी शौचालय उभारले. त्यामुळे तृतीयपंथीयांनी वायकर यांचा प्रचार करण्याचे ठरवले आहे.

महायुतीकडून उमेदवारी जाहीर होताच तृतीयपंथीयांनी रवींद्र वायकर यांची भेट घेतली होती. नुसती भेट न घेता त्यांच्या समवेत काम करण्याची इच्छाही व्यक्त केली होती. त्यानुसारच द्वारकामाई चॅरिटेबल ट्रस्टच्या १०० पेक्षा जास्त तृतीय पंथी, महिला व पुरूष तसेच मुलं आणि मुली असे मिळून सुमारे १००० जण रविवारच्या प्रचारात सहभागी झाले होते.

# मल्लिकार्जुन खर्गेंचा धुळ्यात अशोक चव्हाण आणि अजित पवारांवर निशाणा



**राजदंड न्युज नेटवर्क :** काँग्रेसच्या धुळे लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार शोभा बच्छाव यांच्या प्रचाराच्या निमित्ताने आज काँग्रेसची धुळ्यात जाहीर सभा पार पडली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे स्वत: या सभेला उपस्थित होते. मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या भाषणात महायुतीच्या नेत्यांवर निशाणा साधला. यावेळी मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या भाषणात उमेदवार शोभा बच्छाव यांच्या नावाचा शोभा बच्चन असा उल्लेख केला. ही निवडणूक माझी निवडणूक आहे. ही निवडणूक काही लहान-मोठी निवडणूक नाही. ही नगरपालिकेची किंवा जिल्हा परिषदेची निवडणूक नाही, आमदारकीची निवडणूक नाही. ही निवडणूक देशाचं भविष्य बनवणारी निवडणूक आहे, असं मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले. देशाचं भविष्य बनवण्याचं, देशाची लोकशाही टिकवण्याचं आपलं काम आहे. लोकशाही जर या देशात राहिले नाही, संविधान राहिलं नाही, तर आपल्याला कोणीच विचारणार नाही, असं मल्लिकार्जु खर्गे म्हणाले.

मतदान हे सर्वात महत्त्वाचं आहे. महात्मा ज्योतिबा फुले, संत ज्ञानेश्वर, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक श्रेष्ठ माणसं या महाराष्ट्राच्या भूमीत जन्मले. या सर्वांनी जे मार्गदर्शन दिलं ते महत्त्वाचं आहे. तेच काम आपल्याला करायचं आहे. पण जर ते काम केलं नाही तर आपण पुढच्या पिढीला गुलामगिरीत ढकलू. आदिवासींचे स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवसांसारखे दिवस येतील. पुन्हा तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींना मतदान केलं तर स्वातंत्र्यपूर्वीची गुलामीची स्थिती निर्माण होईल, असा दावा मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलाय

आपण यासाठी हे लक्षात ठेवलं पाहिजे हे मत आपल्या स्वतःसाठी द्यायचं आहे. स्वातंत्र्य वाचलं तरच आपण जगू. तरच गरिबाचं राज्य राहील. नंदुरबारमध्ये इंदिरा गांधी आल्या तर संपूर्ण देश हलला. हा काँग्रेसचा गड आहे. संविधानाची सर्वात जास्त संरक्षण करायची गरज आहे. आपल्याला स्वतःच्या फायद्यासाठी नाही तर सर्वांच्या फायद्यासाठी करायचं आहे, असं मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले.

‘मोदी निवडून आले तर ते संविधान बदलवतील’

गेल्या ५३ वर्षांपासून मी एकाच काँग्रेस पक्षात आहे. लोकशाहीची गोष्ट यासाठी करतो आहे की, एक मोठी संधी आपल्याला आहे, संविधान वाचवायची गरज आहे. भाजप, आरएसएसची लोकं सविधान संपवण्यासाठी ही निवडणूक लढवत आहेत. २०२४ मध्ये मोदी निवडून आले तर ते संविधान बदलवतील. २०१५ मध्येच त्यांनी हे सांगितलं होतं. मोदी नेहमी खोटे बोलतात. मोदींवर टीका केली तर लोक म्हणतात मोदींना खोटं ठरवतात. त्यांनी पहिल्या निवडणुकीवेळी सांगितलं होतं की सत्तेत आल्यास विविध देशात असलेला काळा पैसा परत आणू. हा काळा पैसा देशात आणून सर्वांना १५-१५ लाख रुपये देणार, असं मोदी म्हटले होते. १५ लाख भेटले का?, असा सवाल मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला.

‘ईडीसीडीला घाबरून अशोक चव्हाण’

तुझे सरकार निवडून येत आहे. त्याला कसं काढायचं? याची त्यांच्याकडे चावी आहे. एक ईडी आहे, एक सीबीआय आहे आणि एक इन्कम टॅक्स आहे. या तीन चाव्या घेऊन ते फिरत आहेत. एक चावी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे असते दुसरी नरेंद्र मोदींकडे असते. ईडीसीडीला घाबरून अशोक चव्हाण आणि अजित पवार भाजपसोबत गेले. पळून जाणारे माणसं राज्यासाठी कशाला काम करतील? पळून जाणारे माणसं देशासाठी लढतील?, असे खोचक सवाल मल्लिकार्जुन खर्गे यांनी केले.

# राज ठाकरे यांचा महायुतीच्या सभेत परप्रांतीयांवर हल्ला



**राजदंड न्युज नेटवर्क** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठींबा दिला आहे. आपला पाठींबा भाजपाला नसून केवळ मोदींना आहे असेही राज ठाकरे यांनी म्हटले होते. महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी राज यांनी सुरुवात केली आहे. या लोकसभा निवडणूकीत मनसेचा एकही उमेदवार उभा राहीलेला नाही. तरीही महायुतीसाठी राज ठाकरे यांची ही तिसरी सभा आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा परप्रांतीयांचा मुद्दा हाती घेताल आहे. ठाणे जिल्ह्यातील इतकी लोकसंख्या वाढली आहे की शहराची बजबजपुरी झाली आहे. कोणी एकेकाळी नाही. ३० ते ३५ वर्षाचा काळ असेल. पण अशी टुमदार शहरं उभी राहिली पाहिजे. हा ठाणे जिल्हा देशातील मी काय बोलतो ते लक्षात ठेवा. ठाणे लोकसभा, कल्याण लोकसभेची संयुक्त सभा आहे. मी गेल्या अनेक वर्षापासून सांगतो आज वेगवेगळ्या राज्यातून लोक येत आहेत. तुम्ही कितीहा काम करा, कितीही रस्ते बांधा, पूल बांधा. तुम्ही बाहेरचे लोंढे थांबणार नाही, तुम्ही कितीही विकास केला तरी या शहरात काही घडणार नाही. खासदार श्रीकांत शिंदे आणि म्हस्के यांनी कितीही फंड आणले तरी मी फक्त ठाणे जिल्ह्याबद्दल बोलतो. सर्व बाहेरून लोकं येत आहेत. त्याचे सर्वांत जास्त प्रमाण ठाणे जिल्ह्यात असल्याची टीका राज ठाकरे यांनी केली.

राज ठाकरे पुढे म्हणाले आज संध्याकाळपासून खोकला सुरु झाला. वातावरणच इतक गढूळ झाले आहे. डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की फेव्हीकॉल का मजबूत जोड आहे. बाहेरून पण फेव्हीकॉल लावा असेही ते यावेळी राज म्हणाले. आज आपण आनंदमठात गेलो. आनंद दिघे आणि माझे वेगळे मैत्रीपूर्ण संबंध होते. आज आनंदमठात गेलो तर वेगळेच होते. स्वच्छता दिसत होती. त्यावेळी दहा वाजेपर्यंत सभा आटोपा असा प्रकार नव्हता. गाद्या लोड ओले होणे, दव पडणे असे प्रकार होते असे राज ठाकरे यांनी सांगितले.

# जेजुरीत पॅरामोटर घरावर कोसळले

**जेजुरी :** जेजुरी येथील कडेपठार रस्त्यावर असलेल्या फ्लाईंग रायनो पॅरामोटरिंग एडवेंचर स्पोर्ट सेंटरचे एक पॅरामोटर अचानक तांत्रिक बिघाड झाल्याने चिंचेच्या बागेजवळील एका पत्र्याच्या घरावर कोसळले. या अपघातात पॅरामोटरिंग करणारी युवती अस्था प्रदिप माने ( वय , १७ रा.वाकड,पुणे ) व पायलट चंद्रकांत महाडिक हे जखमी झाले आहेत.

आज सायंकाळी पाच वाजता पॅरामोटरने अस्था माने यांना घेऊन उड्डाण केले.काही वेळातच पॅरामोटर छत्रीच्या मंदिराजवळ आल्यावर वाकडे-तिकडे हेलकावे खाऊ लागले व ते खाली आले. भरवस्तीमध्ये असलेल्या दरेकर वाड्यातील सतिश गोडसे यांच्या पत्र्याच्या घरावर ते कोसळले.रविवार असल्यामुळे या परिसरामध्ये भाविकांची प्रचंड गर्दी होती. हे पॅरामोटर घरावर कोसळल्याने सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.या घरामध्ये एक महिला स्वयंपाक करीत होती.घाबरुन ती बाहेर पळत आली.पॅरामोटर कोसळल्याने घराची भिंत पडली,पत्रे तुटले.या ठिकाणी असलेल्या ग्रामस्थांनी पायलट व जखमी युवतीला तातडीने दवाखान्यात पाठवले.

# शिरोळातील व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरोळ :** महात्मा बसवेश्वरांनी खऱ्या अर्थाने लोकशाहीची मूल्ये रुजवली आहेत त्यामुळेच त्यांना लोकशाहीचे जनक म्हटले तरी वावगे ठरणार नाही त्यांच्या आदर्श विचाराची गरज आजच्या लोकशाहीला आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते आनंद कर्णे यांनी केले

शिरोळ येथील श्री महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प प्रसिद्ध व्याख्याते आनंद कर्णे (नांदेड) यांनी 'बसव प्रणित लोकशाही ते आजची लोकशाही एक चिंतन ' या विषयांवर गुंफले.

आनंद कर्णे बोलताना पुढे म्हणाले, की

महात्मा बसवेश्वर यांच्या मते लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली शासन यंत्रणा म्हणजे लोकशाही होय.

समतेच्या विचारावर विश्वास ठेवून लोकशाहीचा पाया घातला.महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात प्रथमतः लोकशाहीची मूल्ये रुजविली. स्त्रियांना शिक्षण व पूजेचा अधिकार दिला.प्रत्येकाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग मिळविण्याचा अधिकार दिला. १२ व्या शतकात माणसाला सन्मान नसताना लोकशाहीची मूल्ये रुजविली.म्हणूनच खऱ्या अर्थाने लोकशाहीचे जनक महात्मा बसवेश्वर आहेत.

भारतीय लोकशाही समजून घेताना महात्मा बसवेश्वरांची लोकशाही समजून घेणे महत्वाचे आहे.हजारो वर्षापूर्वी देवमाणूस होताना सात तत्वे आत्मसात करण्याचे महात्मा बसवेश्वरांनी प्रथमतः सांगितले.

एखादया समस्येवर,उणिवेवर चिंतन करून,चर्चा करुन वचनांची निर्मिती केली. पात्रतेनुसार पदांवर निवड करण्यात येत होती.बसवेश्वरांचे वचन म्हणजेच कायदा १२ व्या शतकात अनुभव मंटपात निर्मिती केली.एखादया समस्येवर, उणिवेवर चिंतन करून,चर्चा करुन वचनांची निर्मिती केली. पात्रतेनुसार पदांवर निवड करण्यात येत होती.

महात्मा बसवेश्वर आपण समजून घेण्याची आज गरज आहे.लोकशाहीच्या उत्सवात प्रत्येकांनी आपला मताचा अधिकार बजाविला पाहिजे.हा वापरला नाही तर चिंतनीय आहे.

दरम्यान व्याख्यानमालेत श्रोता प्रोत्साहन बक्षीस योजना राबविली गेली.रोज महिला,पुरुष,युवती, १ली ते४थी, इ.५वी ते १०वी विद्यार्थी अशा गटांसाठी १५ बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष व माझी नगरसेवक डॉ.अरविंद माने होते.यावेळी माजी सरपंच शिवाजीराव माने -देशमुख,माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील, सामाजिक कार्यकर्तेअमोल हिरेमठ,सचिन कोरोचीकर, अशोक कांबळे,विवेक चुडमुंगे, सुभाष आंबी,प्रविण आंबी, दिलीप शिरढोणे,ओंकार पाटील, संजय कांबळे, रमेशकुमार मिठारे, आप्पासो पाटील यांचेसह सांगली जिल्हा शिरोळ शहर व तालुक्यातील अनेक गावांतील शरण व शरणी उपस्थित होते. मारूती शाहू खडके व राजाराम महादेव खडके यांनी अन्नदासोह केले. स्वागत व प्रास्ताविक मनोजकुमार रणदिवे यांनी केले तर आभार महावीर कुंभार यांनी मानले.

# मारहाण प्रकरणी राजेखान जमादार याच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** बातमी विरोधात दैनिकात लावली म्हणून मुरगूड (ता. कागल) येथील बातमीदार प्रकाश तिराळे यांना झालेल्या मारहाणी प्रकरणी डिस्ट्रिक्ट रिपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशन पन्हाळा शाखेच्यावतीने शिवसेना शिंदे गटाचा जिल्हाध्यक्ष राजेखान जमादार व त्याच्या साथीदारांच्यावर कडक कारवाई व्हावी यामागणीसाठी पन्हाळा उपविभागीय अधिकारी,पोलिस निरीक्षक व तहसीलदार पन्हाळा यांना निवेदन दिले.



पन्हाळा पोलिस निरीक्षकयांना निवेदन देताना कोल्हापूर डिस्ट्रिक्ट रिपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशन पन्हाळा शाखेचे सदस्य

प्रकाश तिराळे यांनी दिलेल्या बातमीत कोणाच्याही नावाचा उल्लेख करण्यात केलेला नव्हता. समाजात अनेक घटना घडत असतात. त्याची माहिती संकलीत करून कार्यालयात पोहोचविण्याचे काम बातमीदारांचे असते.त्याच प्रमाणे तिराळे यांनी केवळ घडलेल्या घटनेचे वृत्तांकन करण्याचे काम केले.व खरी, वस्तुनिष्ठ बातमी दैनिकात लावली. पण बातमी लावल्याच्या रागातून गुरूवार ता. ९ रोजी सायंकाळी राजेखान जमादार यांनी बातमीदार प्रकाश तिराळे (रा. कुरूकली) यांना मारहाण केली. हि मारहाणीची घटना पत्रकारिता व लोहशाहीला मारक आहे.तसेच पत्रकारांवर दहशत निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे.तिराळेना झालेली मारहाण म्हणजे पत्रकारिता व लोकशाहीवर केलेला हा हल्ला आहे.त्यामुळे राजेखान कादरखान जमादार व त्याला सहकार्य करणाऱ्या आसिफखान उर्फ मॉन्टी आसदखान जमादार, संदीप अशोक सणगर यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत तातडीने कडक कारवाई करावी अशी मागणी निवेदनात केली आहे.यावेळी नितीन भगवान, कृष्णात हिरवे, उत्तम महाडिक,राजेंद्र दळवी, इंद्रजित शिंदे,संजय पाटील,अबीद मोकाशी उपस्थित होते.

# सातारा जिल्ह्यात उन्हाळी पीक क्षेत्रात घट

## दीड हजार हेक्टरवरच झाली पेरणी



**सातारा :** जिल्ह्यात दुष्काळ असल्याने यावर्षी उन्हाळी पिकाची हवाच गेली आहे. त्यामुळे सुमारे दीड हजार हेक्टरवरच पेरणी झाली. ३२.३० टक्के हे प्रमाण आहे. तर आता खरीप हंगामावरच शेतकऱ्यांची भीस्त असून सर्वांचेच मान्सूनच्या आगमनाकडे डोळे लागले आहेत.

जिल्ह्यातील खरीप आणि रब्बी हे दोन हंगाम महत्वाचे समजले जातात. यातील खरीप हा सर्वात मोठा हंगाम असतो. सुमारे तीन लाख हेक्टर क्षेत्र राहते. तर रब्बीत दोन लाख हेक्टरवर पेरणी होते.

जून महिन्यात मान्सूनचा पाऊस सुरू झाल्यानंतर खरीप हंगाम पेरणीची गडबड सुरू राहते. या मान्सूनवर शेतकऱ्यांचे वर्षभराचे पिकांचे गणित अवलंबून असते. पर्जन्यमान चांगले झाले तर खरीप आणि रब्बी हंगामही पदरी पडतो. तसेच उन्हाळी हंगामातही शेतकरी पिके घेतो. पण, गेल्यावर्षी जिल्ह्यातच अपुरे पर्जन्यमान झाले. खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांना फटका बसला. उत्पादन कमी झाले. त्यातच दुष्काळी परिस्थितीही निर्माण झाली. यामुळे जिल्ह्यातील उन्हाळी हंगामावर परिणाम झाला.

कृषी विभागाकडून सातारा जिल्ह्यात उन्हाळी हंगामाचे सर्वसाधारण क्षेत्र ४ हजार ८६० हेक्टर निश्चीत करण्यात आले होते.

यामध्ये उन्हाळी भुईमूग, मका, सूर्यफूल, सोयाबीन ही पिके शेतकरी घेतील असा अंदाज होता. मात्र, भुईमूग, मका, सोयाबीन पिके घेण्यात आली. सूर्यफुलाची कोठेही पेरणी झालेली नाही. त्यामुळे दुष्काळाच्या धसक्याने शेतकऱ्यांनी उन्हाळी पिकांकडे कानाडोळा केल्याचे दिसून आले आहे.-

**भुईमूग ११२४ तर मका ४१३ हेक्टरवर..**

जिल्ह्यात उन्हाळ्यात २ हजार ६९९ हेक्टरवर भुईमूग घेण्यात येईल असा अंदाज होता. पण, प्रत्यक्षात १ हजार १२४ हेक्टरवर पेर झाली. ४१.६७ टक्के पेरणी प्रमाण आहे. तर मकाचे सर्वसाधारण क्षेत्र २ हजार ७४ हेक्टर होते. तर पेरणी ४१३ हेक्टरवर झाली. सुमारे २० टक्के क्षेत्रावरच मका पिकाची पेरणी झालेली आहे. सातारा तालुक्यात ३७२ हेक्टर उन्हाळी पिकाचे क्षेत्र होते. पण, पेरणी १४१ हेक्टरवरच झालेली आहे. तसेच जावळीत ३२ हेक्टर, पाटण २०६ हेक्टर, कऱ्हाड तालुक्यात ९३, कोरेगाव ६४, खटाव ४५३, माण ४८ हेक्टर, खंडाळा ९३, फलटण १०३ आणि वाई तालुक्यात ३४ हेक्टरवर उन्हाळी पिके घेण्यात आलेली आहेत.

**उन्हाळी सोयाबीन १६०० वरुन १४ हेक्टरवर..**

मागील तीन वर्षांपूर्वी सोयाबीनला चांगला दर मिळाला. त्यामुळे खरीप हंगामात सोयाबीनचे क्षेत्र वाढले. तसेच दोन वर्षांपूर्वी उन्हाळी सोयाबीन १ हजार ६०० हेक्टरवर घेण्यात आले होते. पण, गेल्या वर्षभरापासून सोयाबीनला दर कमी मिळत आहे. त्यातच दुष्काळी स्थिती असल्याने यंदा उन्हाळी सोयाबीन क्षेत्रात मोठी घट झाली आहे. सोयाबीनचे अंदाजे क्षेत्र ३१ हेक्टर निश्चीत करण्यात आलेले. प्रत्यक्षात १४ हेक्टरवर पेरणी झाल्याचे समोर आलेले आहे.

# टंचाई निधीतून सिंचन योजनांचे पाणी द्या

## आमदार सुमनताई पाटील यांची मागणी



**तासगाव :** तीव्र पाणीटंचाईमुळे दुष्काळी तालुक्यातील जनता होरपळून निघत आहे. या भीषण पाणी संकटावर मात करण्यासाठी दुष्काळी भागाला टंचाई निधीतून सिंचन योजनांचे पाणी देण्यात यावे, अशी मागणी आमदार सुमनताई पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, माझ्या तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदार संघात तासगाव आणि कवठेमहांकाळ हे तालुके आहेत. या दोन्ही तालुक्यात पुरेसा पाऊस झाला नाही. त्यामुळे तीव्र पाणी टंचाई आहे. पुरेसा पाउस झाला नसल्याने शेती पिके अडचणीत सापडली आहेत.

असे असताना प्रशासनाने तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातील मंडले टंचाई सदृश्य जाहीर केलेली आहेत व जिल्ह्यातील इतर तालुक्यातील मंडल दुष्काळ सदृश्य परीस्थिती जाहीर केलेली आहेत. याबाबत माझ्या मतदारसंघावर दुजाभाव केल्याची चर्चा मतदारसंघात होत आहे.

दोन्ही तालुक्याची आणेवारी ही ५० पैशापेक्षा कमी लागण्याची स्थिती निर्माण झाली आहे. हे दोन्ही तालुके तसेच मांजर्डे विसापूर मंडल दुष्काळी म्हणून जाहीर करावेत. टेंभू, ताकारी, म्हैशाळ व आरफळ तसेच विसापूर पुणदी या पाणीयोजचे पाणी टंचाई निधीतून देण्यात यावे. सर्वच शेतकरी बांधवाना दिलासा देण्याचे काम शासनाने करावे. याबाबत तातडीने आदेश होणेबाबत आपणास विंनती आहे.

# विदर्भात १५ ते २८ मे दरम्यान शून्य सावली दिवस



**अकोला :** कुतूहल लागून असलेला शून्य सावली दिवस विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये १५ ते २८ मे दरम्यान अनुभवता येणार आहे. सदैव साथ देणारी आपली सावली काही क्षणांसाठी साथ सोडणार आहे.

सूर्याचा उत्तरायण आणि दक्षिणायन असा भासमान मार्ग पृथ्वीच्या २३.५0ओ दक्षिण आणि उत्तरेकडे असतो. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दरम्यान असणाऱ्या सर्व भूभागावर सूर्य वर्षातून दोनदा दुपारी डोक्यावर येतो आणि दोनदा शुन्य सावली दिवस येतात. उत्तरायण आणि दक्षिणायन होताना ही स्थिती राहते.

सूर्य दररोज 0.५0ओ सरकतो. सूर्य क्रांती पृथ्वीवरील स्थळाशी समान कोन करते, तेव्हा सूर्य माध्यान्हाचे वेळी नेमका डोक्यावर आल्याने आपली सावली काही क्षणासाठी नाहिशी होते. उन्हाळ्यातील त्या शून्य सावली दिवसाला अधिक महत्त्व आहे, असे खगोल निरीक्षक प्रभाकर दोड यांनी सांगितले.

१५ ते २८ मे या कालावधीत या अनोख्या घटनेचा प्रारंभ दक्षिणेकडून उत्तरेकडे संबंधित शहराच्या जवळच्या भागात दुपारी १२ ते १२.३0 या वेळेत घेता येईल. ही वेळ पूर्वेस कमी व पश्चिमेस वाढलेली असेल, असे ते म्हणाले.

**असे राहतील शून्य सावली दिवस**

दि. १५ मे सिरोंचा, १७ अहेरी, आलापल्ली, १८ मूलचेरा, आष्टी, १९ पुसद, बल्लारशा, चार्मोशी, २0 वाशीम, चंद्रपूर, मेहकर, वणी आणि दिग्रस, २१ चिखली, गडचिरोली, सिंदेवाही, २२ बुलढाणा, यवतमाळ, आरमोरी, वरोरा, २३ अकोला, खामगाव, बाळापूर, मूर्तिजापूर, ब्रम्हपुरी, २४ वर्धा, शेगाव, उमरेड, दर्यापूर, २६ नागपूर, भंडारा, परतवाडा, कामठी, २७ गोंदिया, तूमसर, रामटेक, चिखलदरा आणि २८ मे रोजी वरुड, नरखेड परिसरात शून्य सावली दिवस अनुभवता येईल.

**ध्रुवताऱ्याचे दर्शन**

पृथ्वीवरील अक्षवृत्तीय तथा रेखावृत्तीय काल्पनिक रेषांचा खेळ दिवसा बघून रात्रीच्या प्रारंभी उत्तर आकाशात वरच्या बाजूला दिसणाऱ्या सप्तर्षी तारका समूहाच्या आधारे ध्रुवतारा बघता येईल. या ताऱ्याच्या स्थितीवरून पृथ्वीवर आपण कोणत्या ठिकाणी आहोत हे समजते, अशी माहिती दोड यांनी दिली.

# हापूस'ची आवक वाढली

**नागपूर :** आंब्याला पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे यावर्षी आंब्याच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली. परिणामी, नागपुरातील कळमना कृषी उत्पन्न समितीच्या फळ बाजारात आवक वाढल्याने भाव घसरले आहेत. सर्वाधिक विक्रीच्या बैगनपल्ली आंब्याचे १२५ ट्रक दरदिवशी विक्रीसाठी येत आहेत. भाव दर्जानुसार ३0 ते ४५ रुपये किलो आहे. मात्र, किरकोळमध्ये दुप्पट, तिप्पट भावात विक्री होत आहे.



मध्यंतरी आलेल्या पावसामुळे आंब्याची चव आणि दर्जा उत्तम नाही. दुसरीकडे उत्पादन वाढल्याने माल विक्रीसाठी जास्त प्रमाणात येत आहे. भाव गेल्यावर्षीप्रमाणेच आहेत. यंदा आवक ३0 जूनपर्यंत राहील, मात्र १५ जूननंतर कमी होईल. आंध्रप्रदेश आणि तेलंगाना राज्यातून बैगनपल्ली आंब्याचे ५ ते ७ टन क्षमतेचे ११0 ते १२५ ट्रक विक्रीसाठी येत आहेत.मुंबईतून येताहेत हापूसचे ३00 डब्बे

कळमन्यात रत्नागिरीच्या हापूस आंब्याची आवक वाढली आहे. मुंबईहून डझन पॅकिंगचे दररोज ३00 डब्बे येत असून ६00 ते ८00 रुपये डझन भाव आहे. दुसरीकडे आंध्रप्रदेशाच्या हापूस आंब्याच्या २00 क्रेट (प्रति क्रेट २0 किलो) येत असून ८0 ते १00 रुपये भाव आहे. हाआंबाचवीला गोड आहे.लंगडा, दशेरी, तोतापल्ली, केशरची विक्री वाढलीकळमन्यात स्थानिक उत्पादकांकडून लंगडा, दशेरी आणि केशर आंबे विक्रीला येत आहेत. भिवापूर, मांढळ, कोहमारा, गोंदिया, मौदा या भागातून लंगडा आंब्याचे ३0 ते ४0 टेम्पो (प्रति टेम्पो १ टन) विक्रीसाठी येत असून भाव दर्जानुसार प्रति किलो ३0 ते ६0 रुपयांवर आहेत. दशेरीनागपूरजिल्ह्याच्या विविध भागातून कळमन्यात येत आहे. या आंब्याचेही भाव ३0 ते ६0 रुपये किलो आहे. शिवाय स्थानिकांकडून केशर आंब्याच्या २00 क्रेट (प्रति क्रेट २0 किलो) दररोज येत आहेत. ५0 ते ६0 रुपये भाव आहे.

तसेच गुजरात राज्यातून केशर आंब्याचे १0 किलो पॅकिंगचे ३00 बॉक्स विक्रीला येत असून भाव ७0 ते ९0 रुपयांदरम्यान आहेत. आंध्रदेशच्या तोतापल्ली आंब्याचे भाव दर्जानुसार २५ ते ३0 रुपये किलो आहेत. नीलम आंब्याची आवक पावसाळ्यात होणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

कळमना फळे अडतिया असोसिएशनचे अध्यक्ष आनंद डोंगरे म्हणाले, मतमोजणीच्या काळात कळमन्यातील फळ बाजारावर अतिक्रमण नकोच. या बाजारातील लिलावाचे हॉल क्र. ३, ४, ५ प्रशासनाने मतमोजणीसाठी ताब्यात घेतले आहेत. २0 मेनंतर व्यापाऱ्यांना प्रवेश मिळणार नाही. व्यापाऱ्यांच्या सुविधेसाठी प्रशासनाने फळांच्या लिलावासाठी रस्त्यावर मंडप टाकले आहेत. प्रशासनाने मतमोजणी शहराबाहेर वा मानकापूर येथील इंडोअर स्टेडियममध्ये घ्यावी.

कळमना बाजारात अनेक वर्षांपासून बैगनपल्ली आंब्याला सर्वाधिक मागणी असते. त्या खालोखाल केशर, लंगडा, दशेरी, गावरान आंब्याची विक्री होते. रत्नागिरीचा हापूस महाग असल्याने त्याचे ग्राहकही कमी आहेत. गुजरातचा केशर आणि आंध्रप्रदेशच्या हापूस आंब्याची चांगली मागणी आहे. १५ जूनपर्यंत आवक राहील.

# काँग्रेसमुळे सामान्य जनता विकासापासून वंचित



## नवनीत राणा यांची टीका

**राजदंड न्युज नेटवर्क** गेल्या ७५ वर्षांच्या काळात काँग्रेस पक्षाने सामान्य जनतेला विकासापासून वंचित ठेवले आहे, अशी टीका भाजप नेत्या खासदार नवनीत राणा यांनी शनिवारी पैठण येथे केली. लोकसभेच्या जालना मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ रोड शोच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी उमेदवार रावसाहेब दानवे, माजी मंत्री अर्जुन खोतकर, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष रेखाताई कुलकर्णी, विधानसभाप्रमुख डॉ. सुनील शिंदे, तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे, माजी नगराध्यक्ष सूरज लोळगे व कल्याण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.नवनीत राणा म्हणाल्या, एमआयएम वकाँग्रेस पक्षजातीपातीचे राजकारण करत असून, पाकिस्तानचे गुणगान गात आहे. त्यामुळे काँग्रेसला मत देणे म्हणजे पाकिस्तानला मत देण्यासारखे आहे.

नवनीत राणांच्या वक्तव्यावरुन आक्रमक देशातील तीन कोटी महिलांना घरे, शेतकऱ्यांपासून मजूर, कामगार व महिलांना विकास योजनेचा मार्ग पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी दाखवून नवा आयाम दिला आहे. त्यामुळे मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी तुमचे एक मत द्यावे, असे आवाहन राणा यांनी केले.

# प्रचार थांबल्यानंतर पंकजा मुंडे नेमकं काय म्हणाल्या ?

**बीड :** बीड लोकसभा मतदारसंघामध्ये यावेळी चुरस बघायला मिळत आहे. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आणि उमेदवार पंकजा मुंडे यांनी वृत्तवाहिनीला मुलाखत देताना म्हटलं की, निकाल आपल्या हातात नसतो परंतु प्रयत्नांवर माझा विश्वास आहे. आम्ही शंभर टक्के प्रयत्न केले असून यश नक्कीच मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सोमवार, दि. १३ मे रोजी बीडसह राज्यातील नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी या मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

बीडमध्ये शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि पंकजा मुंडे यांच्यात तगडी फाईट झाल्याचं बघायला मिळालं.

रविवारी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, निवडणुकीमध्ये मी आणि माझ्या टीमने अथक परिश्रम घेतले आहेत. निकाल आपल्या हातात नसतो परंतु प्रयत्नांवर माझा विश्वास आहे. आम्ही ४५ दिवस प्रचारात व्यस्त होते.. यावेळी हसत-खेळत प्रचार पार पडला.



# उन्हाळी पर्यटनासाठी पर्यटक गोव्याकडे

**पणजी :** उन्हाळी पर्यटनासाठी गोव्याकडे पर्यटकांची पावले वळू लागली असून रविवारी जुने गोवे येथे देशी विदेशी पर्यटक मोठया संख्येने दिसून आले. यावेळी पर्यटकांनी बासिलिका ऑफ बॉम जिजस चर्च बाहेर रांग लावल्याचे पाहण्यास मिळाले.

बासिलिका ऑफ बॉम जिजस चर्च, सेंट कॅथड्रल चर्च परिसरात पर्यटकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. यात प्रामुख्याने महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, केरळ येथील पर्यटकांचा समावेश होता. अनेक पर्यटक हे आपली वाहने तसेच रेंट अ कार घेऊन आल्याने वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक पोलिस तेथे तैनात केले होते.गोव्यात सध्या कमाल तापमान ३५ डिग्री अंश इतका आहे.

त्यामुळे प्रचंड उकाडा आहे.मात्र असे असूनही उन्हाळी पर्यटनासाठी पर्यटक येत आहेत. जुने गोव्यात पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. यावर्षी डिसेंबर मध्ये सेंट फ्रान्सिस झेव्हियर यांचे शवप्रदर्शन होणार आहे. दर दहा वर्षांनी ते होते. त्यामुळे या निमित देशी विदेशी पर्यटक मोठया संख्येने येण्याची शक्यता आहे.

# रोहितने थेट पीएम मोदींना डिवचलं

**राजदंड न्युज नेटवर्क :** लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात प्रचारसभा सुरू आहेत. काल महाविकास आघाडीची अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात निलेश लंके यांच्यासाठी प्रचारसभा झाली. या सभेत दिवंगत नेते आर आर पाटील (आबा) यांचे पुत्र रोहित पाटील यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. रोहित पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली. पाटील यांच्या भाषणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



निलेश लंके जर साधा माणूस असता तर नगर दक्षिणमध्ये देशाच्या पंतप्रधानांना सभा घेण्याची का गरज भासली याच उत्तर भाजपाच्या उमेदवाराने देण्याची आवश्यक्ता आहे, असा टोलाही रोहित पाटील यांनी सुजय विखे पाटील यांना लगावला.'देवेंद्र फडणवीस साहेब भाषणाला उभे राहिले की सांगतात की, इथल्या स्थानिक उमेदवाराकडे बघू नका. पंतप्रधान मोदींना करायचं आहे तुम्ही त्यांच्याकडे बघून मत द्या. आता याचा एकच अर्थ होतो की त्यांचा स्थानिक उमेदवारावर त्यांचा विश्वास नसावा. पाथर्डीला बैलांचा मोठा बाजार भरतो. इथले अनेक लोक बाजारात जात असतील, बैल खरेदी करत असतील, बैल विकत असतील. मालकाकडे बघून बैल खरेदी केला असं एकरी उदाहरण महाराष्ट्रात आहे का? उद्या आमचे प्रश्न सोडवण्यासाठी दिल्लीतून मोदी साहेब इकडे येणार आहेत का?, असा सवाल रोहित पाटील यांनी केला.

रोहित पाटील म्हणाले, मतदानाचे आणखी टप्पे वाढवले असते तर बोधे गावात सुद्धा सभा घ्यायला यांनी मागे पुढे बघितले नसते. एवढी दयनीय परिस्थिती यांच्या पक्षाची झाली आहे.

काँग्रेस सरकारचं नगर जिल्ह्यात मोठं काम

महाराष्ट्र वेगळपण महाराष्ट्राने नेहमी जपलं. राज्यावर काँग्रेस तसेच सर्वच घटक पक्षाने उपकार केले आहेत. १९७२ च्या दुष्काळात मोठं काम केले आहे. नगर जिल्ह्याने अनेक मोठी माणस घडवली. सगळ्या नेत्यांचे उपकार या परिसरावर आहेत. या उपकाराची जर परतफेड व्हायची असेलतर या निवडणुकीपेक्षा दुसरी कोणतीही संधी नाही. ही देशाची निवडणूक आहे. देशाचा पंतप्रधान निवडण्याची ही निवडणूक आहे. महाराष्ट्रातील लोकांना माझा एक सवाल आहे, छत्रपती शिवाजी महाराजांपासून आम्ही एक स्वप्न बघत आहे, महाराष्ट्रातून कुणीतरी उठावं आणि दिल्ली काबीज करावी. दिल्लीवरती राज्य करावे, पवार साहेबांच्या माध्यमातून ही संधी आली होती. पण, तानाजी मालुसरेंसारखी कोणी साथ देण्याऐवजी सूर्याजी पिसाळ होऊन पाय खेचण्याचे काम आमच्याच मातीत केले. आता पवार साहेबांचा दिल्लीत मान वाढवायचा असेल तर आपण सर्वांनी महाराष्ट्रातून पवार साहेबांच्या मागे खासदार वाढवले पाहिजेत, असंही रोहित पाटील म्हणाले.

# सोलापूर जिल्ह्यात दुष्काळात पाणीप्रश्न गंभीर

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीनंतर दुष्काळी प्रश्नावर जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने पाऊल टाकत उपाययोजना आखायला सुरूवात केली आहे. सध्या जिल्ह्यात पाणी प्रश्नावर शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला असताना १३७ गावे आणि ९१२ वाड्यांवर राहणारे तीन लाख ७६ हजार ९८७ लोक पाण्याविना तहानलेले आहेत. त्यांच्यासाठी १६७ टँकर वापरून पाणीपुरवठा होत आहे. मात्र दुसरीकडे जिल्ह्यात ४२ लाख ८६ हजारांपेक्षा अधिक पशुधन पाणी आणि चाऱ्यासाठी व्याकूळ झाले आहेत.

एकीकडे सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान मानल्या जाणाऱ्या उजनी धरणात मागील पावसाळ्यात अत्यल्प पावसामुळे गेल्या ऑक्टोबरमध्ये ६0.६६ टक्के एवढ्याच पाणीसाठ्यापर्यंत मजल गाठता आली होती. या पाण्याच्या वाटप नियोजनाचेही तीनतेरा वाजल्यामुळे धरणातील पाणीसाठा गेल्या जानेवारीत हिवाळ्यातच मृत पातळीत आला होता. एकूण १२३ टीएमसी क्षमतेपैकी ६३ टीएमसीच्या खाली गेलेला पाणीसाठा मृत किंवा वजा पातळीवर नोंद होतो. वजा पातळीत गेलेल्या पाण्याचा वापर शेती आणि उद्योगासाठी न होता केवळ पिण्यासाठी करण्याचे बंधन आहे. सोलापूरसह पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला भागातील गावांना पिण्यासाठी धरणातून भीमा नदीवाटे पाणी सोडले जाते. त्यासाठी एका वेळेस पाच टीएमसीपेक्षा जास्त पाणी सोडले जाते. सध्या सोलापूर शहरासह पंढरपूर, मंगळवेढा आणि सांगोल्यासाठी धरणातून पाणी सहा हजार क्युसेक विसर्गाने नदीवाटे सोडले जात असून हे पाणी येत्या २0 मे पर्यंत सोलापूरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

सध्या उजनी धरणात केवळ वजा ४४ टक्के म्हणजे जेमतेम ३७.७१ टीएमसी पाणीसाठा शिल्लक रहिला आहे. येत्या २0 मेपर्यंत या पाणीसाठ्यात आणखी मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या जूनमध्ये उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस न झाल्यास धरणातील पाण्याची परिस्थिती चिंताजनक राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

दुसरीकडे जिल्ह्यात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणावर भेडसावत असताना जिल्हा प्रशासन लोकसभा निवडणुकीत गढून गेले होते. निवडणुकीचे मतदान झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने पाणीटंचाईवर उपययोजना करण्याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला सुरूवात केली तरी ग्रामीण भागात पाणी आणि मुक्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. करमाळा तालुक्यात सर्वाधिक एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या ३९ गावे आणि २६१ वाड्या-वस्त्यांना ४३ टँकरने पाणीपुरवठा होत आहे. तर सांगोला तालुक्यात २८ गावे आणि २३५ वाड्यांतील ६८ हजार ६00 लोकांसाठी ४१ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. माढा तालुक्यात १५ गावे आणि ११ वाड्यांवरील तहानलेल्या ५१ हजार ८४४ लोकांना १६ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. मंगळवेढ्यात १६ गावे आणि २५५ वाड्या-वस्त्यांवरील ४0 हजारांहून अधिक खेडुतांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, त्यासाठी प्रशासनाकडून २२ टँकरने पाणीपुरवठा होत आहे. माळशिरस तालुक्यात ३६ हजार २५१ लोकसंख्येच्या १८ गावे आणि १८५ वाड्यांची तहान भागविण्यासाठी १८ टँकर वापरले जात आहेत.

दुसरीकडे जिल्ह्यात मुक्या पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न भेडसावत असून ४२ लाख ८६ हजार ९९८ एवढ्या पशुधनावर संकट ओढवले आहे. येत्या जूनपर्यंत पुरेल एवढा चारा निर्माण करण्यासाठी पशुपालक शेतकऱ्यांना चारा बियाणे वाटप करण्यात आल्याचा दावा जिल्हा प्रशासनाने केला आहे.

## शिकार, तस्करीला आळा घालण्यासाठी सायबर सेल

**सांगली :** सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रात शिकार आणि अवैध वन्य प्राण्याच्या अवयवांचा चोरटा व्यापार रोखण्यासाठी कोल्हापूरमध्ये सायबर सेल सुरू करण्यात आला आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाप्रमाणे हा सेल कार्यरत राहणार असल्याचे सांगण्यात आले. या सेलचे उद्घाटन क्षेत्र संचालक आर.एम. रामानुजम यांच्या हस्ते करण्यात आले.

याबाबत माहिती देतांना विभागीय वन अधिकारी एस.एस. पवार यांनी सांगितले, वन्यजीव व वनगुन्हे यांना आळा घालण्यासाठी संशयित आरोपी यांच्यावरील आरोप सिद्द होण्यासाठी आवश्यक तांत्रिक माहिती या सायबर सेलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. यामुळे अवैध शिकारी व वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी तसेच तपास करण्यासाठी वन विभागाकडील क्षेत्रिय कर्मचारी, अधिकारी यांना लाभ होणार आहे.

वने व वन्यजीव विषयक गुन्हे हाताळणे व आरोपीच्या विरोधात पुरावे गोळा करणे व राज्या बाहेरील आरोपींनाही पकडणे सोईचे होणार आहे. सायबर सेलच्या माध्यमातून वने व वन्यजीव गुन्ह्यामधील आरोपींना शिक्षा होण्यास मदत मिळणार असून क्षेत्रिय कर्मचार्यांना त्याचा अधिकचा फायदा होऊन त्यांचे मनोबल वाढणार आहे.

# पश्चिम विदर्भात टँकर फेऱ्यांमध्ये वाढ; कोट्यवधींचा खर्च

**अमरावती :** सद्यस्थितीत अमरावती विभागात ७१ गावांमध्ये ७५ टँकरच्या सहाय्याने पाणी पुरवण्यात येत आहे. बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक ५७ गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. दरवर्षी कोट्यवधींचा खर्च होऊनही कायमस्वरूपी उपाययोजना का होऊ शकल्या नाहीत, हा प्रश्न चर्चेत आला आहे.

पाणीटंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पाणीटंचाई निवारण कार्यक्रम राबवला जातो. अमरावती विभागात गेल्या पाच वर्षांमध्ये या कार्यक्रमावर सुमारे २00 कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. तरी पाणीटंचाईची तीव्रता कायम आहे. अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यात ५७ गावांमध्ये ५८ टँकर, अमरावती जिल्ह्यात ८ गावांमध्ये ११ टँकर तर यवतमाळ जिल्ह्यात ६ गावांमध्ये ६ टँकर लागले आहेत. अकोला आणि वाशीम जिल्ह्यात अद्याप टँकर सुरू करण्यात आले नसले, तरी येत्या काही दिवसांत टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे.

सद्यस्थितीत अमरावती जिल्ह्यात ११ टँकर सुरू असून त्या माध्यमातून नागरिकांची तहान भागवण्यात येत आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगी मग्रापूर, चिखलदरा तालुक्यातील बेला, मोथा, धामकडोह, आकी, बहादरपूर, गौलखेडा बाजार येथे प्रत्येकी एक तर खडीमल येथे चार टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा होत आहे.

या गावांमध्ये जलजीवन मिशनची कामे अद्यापही झाली नसल्याने या गावांना टँकराद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.




विशेष म्हणजे मागील वर्षी टँकरच्या दूषित पाण्यामुळेच चिखलदरा तालुक्यातील पाचडोंगरी, कोयलारी या गावांमध्ये साथजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

दरवर्षी तात्पुरत्या नळ पाणी योजना, कूपनलिका, इतर पाण्याचे स्रोत पुनरुज्जीवित करणे, खासगी विहिरी अधिग्रहित करणे, टँकरने पाणीपुरवठा करणे यासारख्या उपाययोजना हाती घेतल्या जातात. पाणीटंचाईच्या परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्याच्या दृष्टीने सरकारने राज्यात 'सर्वांसाठी पाणीटंचाईमुक्त महाराष्ट्र' असा नारा देत जलयुक्त शिवार अभियान राबवण्याचा निर्णय २0१५ मध्ये घेतला होता. अमरावती विभागात गेल्या तीन वर्षांत सुमारे ३ हजार १0६ गावे जलपरिपूर्ण झाल्याचा दावा करण्यात येत असताना, अनेक भागांत पिण्याच्या पाण्यासाठी चाललेली वणवण विरोधाभास स्पष्ट करणारी ठरली आहे.

**विहिरी, नद्या, नाले आटले; तलावांनी गाठला तळ**

बुलढाणा जिल्ह्यात यंदा डिसेंबर २0२३ अखेरीस दोन टँकर सुरू होते. नंतर, त्यात झपाट्याने वाढ होत गेली. सध्या ५ तालुक्यातील ५७ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. या गावांची तहान टँकरने होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठाद्वारे भागवली जात आहे. याशिवाय ८ तालुक्यातील १३६ गावांना १६८ अधिग्रहीत खासगी विहिरींद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. माणसांना पिण्याचे पाणी मिळत नाही, तेथे जनावरांना कुठून पुरवायचे, असा प्रश्न गावकऱ्यांना पडला आहे. अनेक भागांतील विहिरी, नद्या, नाले आटले असून तलावांनीही तळ गाठला आहे. धरणांमधील साठाही झपाट्याने कमी होत आहे.